# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.३०/०५/२०२५

## जिल्हा : सोलापूर

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (३०/०५/२०२५ ते ०३/०६/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 31 | 1 | 2 | 3 | 4 |
| पाऊस (ममी) | 6 | 2 | 3 | 3 | 2 |
| कमाल तापमान (अं.से.) | 33 | 34 | 35 | 35 | 36 |
| कमान तापमान (अं.से.) | 22 | 22 | 23 | 23 | 24 |
| ढग स्थिती (आकाश) | 7 | 6 | 5 | 5 | 4 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 95 | 94 | 88 | 89 | 89 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 80 | 76 | 75 | 76 | 75 |
| वाऱ्याचा वेग (कमी/तास) | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 268 | 265 | 247 | 241 | 244 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ३० मे, २०२५ ते ०३ जून, २०२५ दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०१ ते ०७ जून, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पावसाची शक्यता असल्याने फळ बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक पाण्याचा निचरा करावा.<br>• पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी, तसेच उघड्यावरील धान्य ताडपत्रीने झाकून ठेवावे.<br>• पावसानंतर बागेत, शेतात, बांधावर पडलेला काडीकचरा, फळे, पाने, फांद्या वेचून बाग स्वच्छ करावी व खत करण्यासाठी वापरावे. पावसानंतर शेतातील उभ्या पकाची पड झाली असल्यास पक बांधणी करावी.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास, व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी , हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, मेघगर्जना व वजेच्या पूर्वानुमानाकरिता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | • शेतकरी बंधूनी, कृ ष वषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृ ष वद्यापीठाच्या कृ षदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• पाण्याचे पूर्नभरण : पाणी ज मनीत जास्तीत मुरेल व वाहून जाणार नाही याचा प्रयत्न करावा. पावसाचे घराच्या छतावर पडणारे पाणी पाइपद्वारे एखाद्या टाकीत जमा करावे व त्याचा वापर वहिर पुर्नभरण कंवा बोअरवेल पूर्नभरण करण्यासाठी वापरावे. |
| खरीप पक नियोजन | | सध्या वापसा येण्यास वेळ लागण्याची शक्यता असल्याने शेतकरी बंधूंनी पेरणीची घाई करू नये. शेतामध्ये पावसाचे पाणी साठून राहणार नाही यासाठी व अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी शेतातून पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था करावी. वापसा आल्यानंतर कुळवाने मशागत करावी म्हणजे उगवलेल्या ताणाचा बंदोबस्त होईल व शेत पेरणी योग्य होईल. खरीप हंगामातील पकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमा णत बियाण्याचे नियोजन करावे. |
| उन्हाळी पके | साठवणूक अवस्था | काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. तसेच उघड्यावरील शेतमाल ताडपत्रीने झाकून ठेवावा. |
| कपाशी | | जमीनीतील तापमान कमी झालेले नसतानाही लागवड केल्यास कीड व रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते, त्यामुळे जमीनीतील तापमान कमी झाल्या शवाय लागवडीची घाई करू नये. |
| ऊस | पक वाढीची अवस्था | ऊस पकातील खोड कडीच्या जै वक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चलोनिस (ट्रायकोकार्ड) चार प्रती एकर तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) प्रती हेक्टरी ५ वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे ज मनीलगत कापावीत आ ण नष्ट करावीत. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| द्राक्ष | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने खरड छाटणी झालेल्या बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. पाऊसमान व ढगाळ वातावरणामुळे करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बनडॅन्झीम ५० डब्लू.पी., १० ग्रॅम प्रती १० लटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. |
| आंबा | काढणी पूर्ण अवस्था | ज्या बागेतील फळ काढणी पूर्ण झाली असेल त्या बागेत हलकी छाटणी करून घ्यावी. तसेच कॉपर ऑक्झीक्लोराईड २० ग्रॅम प्रती १० लटर पाणी या प्रमाणात पाऊस नसताना फवारणी करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांच्या पण्यात दू षत कंवा गाळ म श्रत पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळ्या गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळ्याचा वापर करावा. जनावरांना मोकळ्या जागेत बांधू नये. त्यांना गोठा , शेड कंवा मजबूत इमारतीत ठेवावे. महात्मा फुले कृषी वद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्र शक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र वभागाच्यावतीने वक सत करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( **Phule Amrutkal App)** या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून , आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड (**Phule Amrutkal App Download)** केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या ॲप च्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी , गोठ्यातील तापमान घट वण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे , योग्य वायु वजन राखणे , पण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे , फॅन कंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतु लत आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

*टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :-

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : ३०.०५.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**